ठाणे महानगरपालिका, ठाणे
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

प्रदूषण नियंत्रण विभाग
तळमजला, महानगरपालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे-
४००६०२.
संपर्क : ०२२ २५३६२९१६
ई-मेल : pcctmc.ho@gmail.com
संकेतस्थळ : thanecity.gov.in

संदर्भ क्र.ठा.म.पा./प्र.नि.क./५८२/२०२१-२२

दिनांक :०१.१२.२०२१

प्रति,
✓ मा. प्राचार्य,
सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय,
ठाणे.

**विषय** : ठाणे महानगरपालिकेद्वारे राबविण्यात येणा-या ई-कचरा संकलन व व्यवस्थापन उपक्रमात (सन २०२०) उत्स्फुर्त सहभागाबाबत.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या घनकचरा व्यवस्थापन अधिसूचनेनुसार ठाणे महानगरपालिकेद्वारे ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील घनकच-याचे व्यवस्थापन करण्यात येत आहे. त्यानुसार घनकच-याचे स्वरुपनिहाय व्यवस्थापनाकरिता विविध प्रकल्प कार्यान्वीत आहेत.

ई-कचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ ची अंमलबजावणी व ठाणे शहरातील ई-कच-याचे शास्त्रोक्त व्यवस्थापनाकरिता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे मान्यताकृत मे. ईको रिसायकलींग लिमीटेड, मुंबई यांचेशी ठाणे महानगरपालिकेने ई-कचरा व्यवस्थापनाबाबत करारनामा केलेला असून सदर आस्थापनेद्वारे नियमितपणे ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ई-कचरा व्यवस्थापन करण्यात येत आहे.

ठाणे शहरातील पर्यावरण रक्षण व संवर्धनाकरिता आपले " **सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय** " नेहमीच कार्य करत आलेले असून आपल्या संस्थेने सन २०२० या एक वर्ष कालावधीत **एकूण २१४.६५ किलो ई-कचरा** संकलीत करुन ठामपाद्वारे नियुक्त मे. ईको रिसायकलींग लिमीटेड, मुंबई या संस्थेचेकडे शास्त्रोक्त व्यवस्थापनाकरिता दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ रोजी जमा केला आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येणा-या ई-कचरा संकलन व व्यवस्थापन उपक्रमात उत्स्फुर्त सहभागाबाबत आपल्या " **सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे** " मनःपूर्वक आभार.

धन्यवाद.

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE
ठाणे महानगरपालिका, ठाणे

Mpradhan
**मनिषा प्रधान**
प्रदूषण नियंत्रण अधिकारी,
प्रदूषण नियंत्रण विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे.